# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-७८ दिनांक:- २९/०३/२०२१

## अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने ०३ पिडीत मुलींची वेश्या व्यवसायातून केली सुटका

दिनांक २६.०३.२०२१ रोजी नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोवेन वाईन एन डाईन हॉटेल (पय्याडे रेसिडेन्सी), मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पुर्व, या ठिकाणी एक वेश्यादलाल हा ग्राहकांना वेश्यागमनासाठी मुलींना दाखवुन पुरवठा करणार असल्याची गोपनीय बातमी पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांना मिळाली. सदर बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांनी पथकासह सदर हॉटेल मध्ये १८.१५ वा. छापा टाकला असता वेश्या दलाल टुटुन उर्फ तापस रविंद्र घोराई, वय-४० वर्षे, रा. बोरिवली पुर्व,मुळ रा. कोलकत्ता, राज्य-पं.बंगाल व त्याचा एक मित्र हे वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्वीकारुन त्या मोबद्दल्यात मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे कडुन वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन मुलगी व इतर ०२ मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत आरोपीत यांचे विरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे पो.हवा./२२६९ उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २०७/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३६६(अ), ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५, सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८, १२ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप.आयुक्त डॉ. श्री महेश पाटील (गुन्हे), मा. सहा. पोलीस आयुक्त, श्री. रामचंद्र देशमुख (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पो.हवा./१९८७ ढेमरे, पो.हवा.१६३ रामचंद्र पाटील, पो.हवा./२२९८ निलंगे, म.पो.ना./१७८९ यंबर, पो.शि./३६६० शिंदे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner